## - प्रकरण १ -

## पंत अमात्य घराण्याचा ऐतिहासिक आलेख

छत्रपती शिवाजी महाराजांनी १७व्या शतकात स्वतंत्र मराठा राज्याची स्थापना केली. लॉर्ड एल्फिन्स्टन[१] यांनी म्हटल्याप्रमाणे तत्कालीन अंतर्गत अशा अत्यंत विस्कळीत आणि अंधाधुंदीच्या परिस्थितीवर मात करून स्वतंत्र मराठा राज्य स्थापन्याचा शिवाजी राजांनी यशस्वी उद्योग केला होता. हा उद्योग करताना त्यांनी अनेक मातब्बर योध्दे व बाकबगार राजकारणी लोक हाताशी धरलेले होते. अनेकांना तशी प्रेरणा देऊन निर्माण केलेले होते. त्यामुळे मराठा राज्य निर्मिती व स्वरक्षण त्यांना शक्य झाले होते. अशी जी माणसे त्यांनी निर्माण केली होती, त्यामध्ये रामचंद्रपंत अमात्य हे एक होते. या रामचंद्रपंतानी अगदी तरुणपणापासून शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत कार्य केलेले होते आणि त्यांचा विश्वास संपादन केलेला होता. स्वाभाविकच शिवाजी महाराजांचा सन १६७४ मध्ये जो राज्याभिषेक झाला व त्यानंतर त्याजी आपले जे अष्टप्रधानमंडळ नियुक्त केले, त्यामध्ये रामचंद्रपंताना अमात्यपद देण्यात आले होते.[२] रामचंद्रपंत हुषार, कर्तबगार आणि स्वामिनिष्ठ होते. म्हणूनच छत्रपतींच्या परिवारांमध्येसुध्दा त्यांचे विशेष महत्त्व होते. आणि त्यांचे जे महत्त्व होते म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्यानंतर सुध्दा त्यांचा मानसन्मान व पद कायम राहिले होते.

शिवाजी महाराजांच्यानंतर रामचंद्रपंतानी आपली राजनिष्ठा मराठी राज्याच्या सेवेसाठीच अर्पण केलेली होती. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या

---

१. Elphinstone, Mountstuart., The History of India: The Hindu and Mahometan period, Sixth Ed., John Murray, Albemarle street, London, 1874, p.644.

२. Sardesai., G.S., New History of the Marathas, Vol.I, Third Impression, Phoenix Publications, Bombay, 1971, p. 223.

नंतर संभाजी छत्रपती यांच्या कालातही रामचंद्रपंताच्याकडे अमात्यपद राहीले.[3] पुढे कोल्हापूर मराठा राज्य संस्थापिका, महाराणी ताराबाई यांच्या कालातही रामचंद्रपंताच्याकडे हे पद टिकलेले आहे.[४] रामचंद्रपंताचे हे कर्तृत्व मराठा इतिहासात असामान्यसाधारण आहे. तसेच मराठा राज्याच्या उभारणीसाठी त्यांनी लावलेला हातभारही अत्यंत महत्त्वाचा आहे, तथा अभ्यासनीय आहे. म्हणून छत्रपती शिवाजी महाराज ते छत्रपती महाराणी ताराबाई यांच्या कालापर्यंत मराठा राज्यात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या या कर्तृत्ववान थोर पुरूषांच्या कार्याचा संशोधनात्मक आढावा घेण्यापूर्वी त्यांच्या घराण्याच्या इतिहासाचा आलेख थोडक्यात पुढील प्रमणे देण्यात आलेला आहे.

## रामचंद्रपंताचे पूर्वज:

रामचंद्रपंताच्या पूर्वजांच्या विषयी ऐतिहासिक कागदपत्रात जी माहिती मिळते ती १५व्या शतकाच्या पासूनची आहे. आणि त्यांचे पूर्वज हे तसे तत्कालीन परिस्थितीनुसार त्यांच्या गावात प्रतिष्ठीत होते, असे दिसते; याचे कारण ते ब्राम्हण होते.[५] आणि ब्राम्हण समाजातील लोकांना त्याकालातील हिंदूधर्मव्यवस्थेत फार मोठे स्थान होते. शिवाय त्यांच्या पूर्वजांकडे देशमुखी[६] वतन असण्याचीही माहिती मिळते. रामचंद्रपंताचे असे हे पूर्वज १५व्या शतकात भादाणे तर्फ सोनवडे प्रांत कल्याण (कलियाणी) येथे राहत होते. यांच्या पूर्वजाचे उपनाव भादाणेकर असे होते. या उपनावासंबंधी रा.म. गोरे लिहितात- "त्यांजकडे भादाणें, कुकसें (कुक्षा) वगैरे गांवचें वतनी कुलकर्ण होते. हे ऋग्वेदी देशस्थ ब्राम्हण आहेत. बहुधा देशस्थ ब्राम्हणांत मूळचीं उपनांवे न राहतां तीं त्यांस गांवावरून अथवा धंद्यावरून नवीन प्राप्त होतात. त्यास

---

३. गोरे, रा.म., पंतअमात्य संस्थान बावडा यांचे वंशवृत्त, १९१६, पृ.३२.

४. Sardesai, G.S., op. cit., p. 371.

५. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ.१.

६. खरे, रा.चि., व जोशी, प्र.पं., संपा. आज्ञापत्र वोरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा.लि.मुंबई, १९६०, पृ.६०.

अनुसरून यास भादोणेकर असे नांव प्राप्त झाले."[७] बावडेकर पंत अमात्य घराण्याचा इतिहास सांगणारे गोरे यांनी सांगितल्याप्रमाणे सन १४९० च्या सुमारास रामचंद्रपंताच्या पूर्वजांच्या पैकी नारोपंत व काळोपंत हे दोन बंधू पारंपारिक एकत्र कुटुंबपध्दतीप्रमाणे एकत्र राहत होते. नारोपंत हे वडिल बंधू. हे नारोपंत धाडसी, पाणीदार व उदार प्रवृत्तीचे होते. परंतु त्यांची आर्थिक परिस्थिती दिवसेदिवस वाईटच बनत गेल्याने, त्यांनी नशीब शोधण्यासाठी कर्नाटक प्रांती जावून सरकारची कामे करून भरपूर द्रव्य मिळविले व फार मोठया प्रमाणावर त्यातील द्रव्य त्यांनी आपला कनिष्ठ बंधू काळोपंत याच्याकडे पाठविले. म्हणूनच पुढे हे घराणे श्रीमंत झाले व त्यांच्याकडे १०,७०० होन होते अशी माहिती मिळते.[८]

नारोपंत, हे या घराण्याचे कर्तेपुरुष होते. तथापी त्यांच्या विषयी अशी फारशी माहिती मिळत नाही. पण नारोपंतानी कर्नाटकातून जे द्रव्य पाठविले होते, त्याच्या जोरावर काळोपंतानी आपल्या घराण्याची दौलत बरीच वाढविल्याचे दिसते. काळोपंताच्या जवळ जेव्हा थोरल्या बंधूच्यामुळे भरपूर द्रव्य जमले होते, तेव्हा त्यांनी त्या द्रव्याच्या जोरावर इ.स. १५३३ मध्ये भादाणे व कुकसे,ही दोन्ही इनाम गावे खरेदी घेतला.[९] "पण राजवाडे यानी संपादित केलेल्या खंड आठ मधील लेखांक ३७ नुसार ही खरेदी निळो नारोपंत यानी शके १४४५ मध्ये म्हणजे सन १५२३ मध्ये केली होती. इतिहासकार ग.ह. खरे यांनी मात्र अमात्य घराण्याचा पूर्वज निळोपंत असे दाखविले आहे व या निळोपंतानेच भिवंडी प्रांतातील सोनवले तर्फेचे देशमुखी वतन विकत घेतले होते, असे म्हटले आहे.[१०]

---

७. गोरे,रा.म.,उपरोक्त.,पृ.१.

८. उपरोक्त.

९. बनहट्टी,श्री.ना.,संपा.आज्ञापत्र,सुविचार प्रकाशन मंडळ,नागपूर,पुनर्मुद्रण, १९८४,पृ.१८-१९. बनहट्टी यांच्या मताप्रमाणे निळोपंत याने सोनवले तर्फेचे देशमुखी वतन खरेदी केले होते.

१०. खरे,ग.ह.,व भिडे,शी.र.,संपा.आज्ञापत्र,सिटीबुकस्टॉल,पुणे,१९६०,पृ.१३

तथापि गोरे यानी मात्र ही खरेदी काळोपंतानी केली असे म्हटले आहे.[११] अर्थात या काळोपंताविषयीसुध्दा ऐतिहासिक मतभेद आहेत. ग.ह. खरे यांच्या मताप्रमाणे निळोपंतानी कामानिमित्त बेदरास जाताना काळोपंताला गुमास्ता म्हणून ठेवले होते आणि या काळोपंताने निळोपंताची इनाम गावे बळकावली होती.[१२] पण गोरे यांच्या मताप्रमाणे मात्र, काळोपंत हा निळोपंताचा चुलता होता. निळोपंत आपले वडिल नारोपंत यांचेबरोबर कर्नाटकात गेला होता. आणि वडिल कर्नाटकात मरण पावल्यानंतर निळोपंत भादाणे येथे आले आणि त्यांनी एकत्रकुटुंबपध्दतीतून विभक्त होऊन इस्टेटीवर हक्क सांगितला. तेव्हा काळोपंतानी निळोपंताला इस्टेटीचा हक्क नाकारल्यावर निळोपंताने "हकीम" नावाच्या आदिलशाही अम्मलदाराकडे फिर्याद केली. पुढे या फिर्यादीची दखल घेऊन गोरे यांनी सांगितल्याप्रमाणे निळोपंतास वतन विभागून मिळाले. तेव्हा काळोपंत कुडास जाऊन राहिले व निळोपंत भादाणे येथेच राहिले.[१३] त्यानंतर निळोपंत काही काळाने बेदरास जाऊन राहिले. तेथे नोकरी मिळविली. त्याकाळात त्याना बादशाहाकडून सोनकले तर्फेची ठाणेदारीव मुजुमी (मुजुमदारी) हे अधिकार मिळाले. पुढे बादशाहाकडची नोकरी चांगली व कायम स्वरुपाची असल्याने आपला चुलता काळोपंत याची समजूत काढून व घरगुती कारण मिटवून आपला चुलता काळोपंत ..यालाच आपले वतनी हिश्याचे कामावर मुतालिक नेमून तो पुन्हा बादशाहाचे ठाणेदारीवर गेला. काही कालानंतर बादशाहाने त्याला सोनकले महालाची सरखोती दिली. त्यानंतर तो भादाणे येथे परत आपल्या घरी आला. परन्तु त्यावेळी त्याचा चुलता काळोपंत याने निळोपंताची सर्व इस्टेट बळकावली होती आणि काळोपंत आपल्या कुटुंबासह जव्हारच्या कोळी राजाचा आश्रय घेऊन राहिला होता.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

११. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ.२.
१२. खरे - भिडेआ., पृ.१३
१३. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ.३.

निळोपंताच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र कृष्णराव हयात होता. तेव्हा काळोपंताचा पुत्र सोनाजी अतिशय वृध्द अवस्थेत होता. या सोनाजीचा मुलगा मुरारराव याने जव्हारच्या राजाच्या मदतीने भादाणे येथील निळोपंताच्या वारसावर घाला घातला. या घाल्याच्या बाबतीत मात्र ग.ह. खरे आणि गोरे यांचे मतऐक्य आहे.[१४] या घाल्यात निळोपंताच्या घरातील १४ माणसांचे खून केले होते व घराची संपूर्ण लूट केली होती. सुदैवाने मात्र, निळोपंताचे चिरंजीव कृष्णापंत यांच्या पत्नीने अत्यंत चतुराईने आपला १२ दिवसांचा मुलगा नारोपंत याचा व आपला स्वत:चा जीव वाचविला होता. पण तो प्रसंगच कठीण असल्यामुळे त्या स्त्रीने भादाणे गाव कायमचे सोडले आणि कशी तरी ती आपल्या माहेरी घाटावर आली. त्यानंतर त्या इस्टेटीचे पुढे काय झाले, याचा उल्लेख मिळत नाही. परंतु काळोपंताच्या वंशात सन १४४६ चे सुमारास मुरार सोनाजीचा नातू मरारभानजी हा या सर्व वतनाची वहिवाट करीत होता, असे गोरे यांचे म्हणणे आहे.[१५]

## निळोपंताचे वारस:

निळोपंतांच्या घराण्यावर जव्हारच्या राजाच्या मदतीने जी धाड घातली होती, तीतून निळोपंताचा नातू नारोपंत हा जो जिवंत राहिला होता, तो खेडेबारे येथील ठकर नावाच्या सद्गृहस्थाच्या घरी लहानाचा मोठा झाला होता. खेडेबारे, हे गाव आणि त्याच्या आजूबाजूचा प्रदेश, हा भोसल्यांचा जहागिरीचा प्रदेश होता. त्यामुळे नारोपंताने मालोजी भोसल्यांचा आश्रय घेऊन समाजात स्वकर्तृत्वावर लौकिक संपादन केला होता.[१६]

---

१४. खरे-भिडेआ.,पृ.१३,आणि गोरे,रा.म.,उपरोक्त., पृ.४.

१५. गोरे,रा.म., उपरोक्त.,पृ.५.

१६. सरदेसाई,गो.स.,मराठी रियासत,भाग.२,१९१५,पृ.३७०.

गो.स. सरदेसाई यांच्या मताप्रमाणे, नारोपंताचा मुलगा सोनाजी हाच [illegible] सोनोपंत डबीर या नावाप्रमाणे औरंगजेबाच्या पत्रात उल्लेखलेला आहे. तो शाहाजी भोसल्यांच्या तैनातीत कारकूनी करित असे. तसेच स्वा-यांच्यावरही जात असे. त्याने शाहाजीची मर्जी संपादन केलेली होती. स्वाभाविकच शाहाजी जेव्हा विजापूरकरांच्याकडे नोकरीला गेले आणि बंगलोर येथे राहू लागले, तेव्हा त्यांनी ज्या काही विश्वासू लोकांना आपल्याबरोबर नेले होते, त्यामध्ये सोनोपंत डबीर हेही एक होते.[१७] म्हणूनच ज्यावेळी शाहाजी राजानी शिवाजी महाराजांना बंगलोरहून पुणे येथील जहागिरीकडे सन १६४१ मध्ये पाठवून दिले, तेव्हा जे विश्वासू अधिकारी शिवाजीच्या बरोबर पाठविले होते, त्यामध्ये डबीरांचा समावेश होता.[१८]

सोनोपंत डबीर यांनी शिवाजी महाराजांच्याकडे अगदी प्रारंभापासून अत्यंत विश्वासाने नोकरी केलेली होती. एवढेच नव्हे तर प्रारंभीच्या काला-पासून मराठा राज्याच्या स्थापनेकरिता जे काही मूठभर जबाबदार लोक होते, त्यामध्ये सोनोपंत डबीरांचा समावेश होता, असे मान्य करावे लागेल. दादोजी कोंडदेवाच्या हयातीत, दादोजी कोंडदेवाच्या मार्गदर्शनाखाली शाहाजी राजांच्या जहागिरीची व्यवस्था पहात असतानाच शिवाजी महाराजांच्या जडणघडणेत सुध्दा ज्या कर्तृत्वान मूठभर मराठ्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे, त्यामध्ये सोनोपंत हेही एक आहेत. कर्तव्यदक्ष अधिकारी व त्याबरोबर शिवाजी महाराजांचे संगोपन योग्य प्रकारे करणारे प्रामाणिक पाईक, अशी त्यांची भूमिका होती. पुणे जहागीरी येथे दादोजीच्या मार्गदर्शनाखाली जहागिरीचे व्यवस्थापन सुरु केल्यानंतर जहागिरीच्या अधिका-यांना वेगवेगळे हुद्दे देण्यात आले होते. त्यामध्ये सोनोपंताना डबीर म्हणजे 'व्यक्त्याभिज्ञ' हा हुद्दा

---

१७. उपरोक्त.

१८. अ) काळे, दि.वि., छत्रपती शिवाजी महाराज, बहि:शाल शिक्षण मंडळ, पुणे विद्यापीठ, पुणे, १९७३, पृ.२७.

ब) दाभाकर, वि.स., संपा. कृष्णाजी अनंत, सभासदाची बखर कथित-छत्रपती श्रीशिवप्रभूचे चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ति, १९७३, पृ.४.

शिवाजीकडून देण्यात आला होता. हे अधिकारी आपआपल्या अधिकाराच्या शिक्क्यासह सन १६४३ पासून कार्य करीत होते.[१९] हे काम करीत असतानाच दादोजी कोंडदेवाच्याप्रमाणे सोनोपंत डबीर व बालकृष्णपंत हणमंते, हे शिवाजी महाराजांच्या संगोपनाची जबाबदारी पार पाडित होते.[२०] "कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे" या ग्रंथातील लेखांक ९८ मध्ये सोनोपंताच्या विषयी सांगितले आहे की "सीवपूर येथे ठकार दिक्षीत याचपाशी सोनोपंत होते ते शाहणे जाणोन आपल्याजवळ ठेवून घेऊन किल्ला भोरची सबनिसी सांगितली."[२१] या अवतर्ण चिन्हातील वाक्याचा अर्थ दोन प्रकारे होईल- एक- सोनोपंत हे दिक्षीतांच्याकडे राहत होते म्हणजे त्यांचे वडिल राहत होते. स्वभाविकच सोनोपंतही तेथे लहानाचे मोठे झाले व शिकलेसवरलेले होते. दोन- या वाक्यातील जसाचा तसा अर्थ असू शकेल म्हणजे शिवाजी महाराजांनी सोनो-पंताना ठकार दिक्षीतांच्याकडून बोलावून घेऊन भोर किल्ल्याची सबनिसी दिली. अर्थात हे पत्र इ.स.१८१७-१८ या वर्षातले आहे. त्यामुळे पत्रकर्त्याची माहिती पत्रातील मजकूराप्रमाणे खरी मानली, तर ती बखरीतील माहितीच्या व इतर कागदपत्रांच्या माहितीबरोबर जुळत नाही. कारण सोनोपंताना बंगलोरहून महाराष्ट्रात पाठविण्यात आले होते.[२२]

सोनोपंत डबीराने शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापन करण्याच्या उद्योगात महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. शिवाजीने पहिला किल्ला घेण्याची योजना आखल्यापासून तो शिवाजीबरोबरच आहे. शिवाजीने राजगड किल्ला घेतल्यानंतर कोंढाणा किल्ला घेतला आणि त्याचे नाव सिंहगड असे ठेवले.

---

१९. शिचसारि.,भाग,२,पृ.१९३-१९४.
२०. उपरोक्त., पृ.३७०.
२१. कर्वीकर,शं.ह.,कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे, कोल्हापूर,१९७१,पृ.१०३.
२२. Sen,Surendranath., Sive Chhatrapati, Calcutta, reprint 1977, p. 3.

हा कोंडाणा किल्ला म्हणजे शिवाजीच्या जहागिरीचा सुरवातीच्या काळातील वालेकिल्ला होता. दि.वि.काळे यांच्या मताप्रमाणे शिवाजीने स्वराज्याचे तोरण सिंहगडावरच बांधले.[२३] सिंहगडानंतर पुरंदर १९ ऑक्टोबर १६४७ ला घेतला. शिवाजीच्या या हालचालित सोनोपंत डबीर आहेत. पण पुढे शहाजीला आदिलशाही दरबाराने पकडल्यावर सिंहगडासह आणखी काही किल्ले परत करण्याविषयी आदिलशाहाने कळविले होते. त्यावेळी सोनोपंताने "वडिलांचे इच्छेस्तव सिंहगड सोडून देणे तुम्हास अवश्य आहे. तुमचे अंगी पराक्रम असेल तर एक सोडून पन्नास किल्ले तुम्हांस घेता येतील", पण पराक्रम नसेल तर "एक किल्ला असून तरी त्याचा काय उपयोग !"[२४] असे सांगितले होते. या विधानाच्या आधारे सुध्दा हे सिध्द होते, की सोनोपंत यांचे शिवाजी बरोबरचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे होते व केव्हाप्रसंगी शिवाजी त्यांचा सल्लाही घेत होता. शेजवलकरानी तर सोनोपंत यांना 'विश्वासू सल्लागार, असेच संबोधले आहे.[२५] याचाच अर्थ असा की सोनोपंताचा अनुभव दिर्घ होता. परिस्थितीचे अकलन त्यांना चांगले होते आणि कठिण प्रसंगात शिवाजीला मार्गदर्शन करण्याइतपत त्यांचा अधिकार होता. असा हा कर्तृत्ववान पुरुष अफझलखानाच्या वधानंतर मरण पावला असावा. कारण अफझलखान प्रकरणी तो हजर असल्याचा उल्लेख सभासदाच्या बखरीत आहे.[२६] सुरेन्द्रनाथ सेन[२७] यांनीसुध्दा ते ग्राहय मानलेले आहे. पण गोरे यांनी मात्र सोनाजीपंत सन १६४५ मध्ये मरण पावल्याचे सांगितले आहे.[२८]

---

२३. काळे, दि. वि., उपरोक्त., पृ. ३७.

२४. सरदेसाई, गो. स. अव्वल मराठशाहीचे अंत:स्वरुप (१६४४-१७०७), नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९३६, पृ. १०.

२५. शेजवलकर, त्र्यं., शं., श्रीशिवछत्रपति संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने, मराठा मंदिर, मुंबई १९६४, पृ. ९९.

२६. वाकसकर, वि. स., उपरोक्त., पृ. १३.

२७. Sen, Surrendranath., op.cit., p. 11.

सोनाजीपंताची मुले:

सोनाजीपंताला निळोपंत आणि आबाजीपंत, अशी दोन मुले होती. निळोपंत आणि आबाजीपंत यांच्या जन्म तारखा मिळत नाहीत. पण ते दोघे बंधू कर्तबगार होते, असे अनेक कागदपत्रांवरून सिध्द झालेले आहे.

निळोपंत हे आपल्या वडिलांच्या मार्गदर्शनाखाली वाढले होते आणि वडिलांच्या हाताखालीच काम करीत होते. साहजिकच अगदी लहानपणापासून शिवाजी महाराजांच्या बरोबर निळोपंताचा संबंध आलेला होता. निळोपंत कर्तृत्ववान असल्यांचे वडिलांच्या हयातीतच सिध्द झाले असले पाहिजे. म्हणूनच वडिलांच्या मृत्यूनंतर शिवाजीने निळोपंतास डबीर म्हणून नेमले होते. आणि ते कामकरीतच गोरे यांच्या मताप्रमाणे त्यांना शिवाजीने सोनोपंताच्या हयातीतच सरकारकून म्हणून नेमले होते.[२९] पुढे सन १६४७ मध्ये हणमंते यांचेकडील मुजुमदारीचा हुद्दा निळोपंताला दिला असल्याचे गोरे यांनी म्हटले आहे.[30] पण ते बरोबर दिसत नाही.

निळोपंताची अशी प्रगती होत असतानाच त्याने आपला बंधू आबाजी याला आपल्या मदतीला घेतले व तत्कालीन रीतिरिवाजानुसार तज्ज्ञ केले. याचा परिणाम असा झाला की आबाजीला शिवाजीकडून मोठी मानासन्मानाची . नोकरी मिळाली. विजापूरकरांची ठाणी जिंकण्याची जबाबदारी शिवाजीने आबाजी पंतावर सोपविली. आबाजी तसा कर्तृत्ववान होता. त्याने कल्याणपासून गोव्यापर्यंतची विजापूरकरांची ठाणी हस्तगत करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यामुळे त्याला सुभेदार म्हणून शिवाजीने नेमले.[३१]

---

२९. उपरोक्त.,पृ.१२.

३०. अ. उपरोक्त.,पृ.१३.
   ब. कुलकर्णी,भीमराव.,संपा.मल्हार रामराव चिटणीस विरचित श्रीशिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र,सुविचारप्रकाशन मंडळ,पुणे, १९६७,पृ.३४.

३१. उपरोक्त.,पृ.१५.

निळोपंत आणि आबाजीपंत अशा त-हेने मराठी राज्य उदयाला येत असताना शिवाजी महाराजांचे अत्यंत विश्वासू व कर्तबगार सेवक म्हणून उदयाला येत होते. या दोघांही बंधूनी मराठयांच्या इतिहासात आपले नांव अजरामर राहावे, असे उदंडकर्तृत्व गाजविले होते. निळोपंतानी शिवाजी महाराजांची केवळ मर्जी संपादन केली होती, असे नव्हे, तर मराठा राज्य वाढविण्याचे कार्यातही भरीव काम केलेले आहे. अफझलखान वधापर्यंतच्या शिवाजी महाराजांच्या सर्व मोहीमांमध्ये निळोपंत आघाडीवर होते. त्याचा बंधू आबाजी पंत, हा सुध्दा स्वकर्तृत्वावर सुभेदार झालेला होता. निळोपंताच्या कामगिरीची दखल शिवाजी महाराजांनी अत्यंत योग्यवेळी घेतलेली दिसते. म्हणूनच त्यांनी निळोपंताला "कदीम वतनीचा कारभार" करण्याचे अधिकार नोव्हेंबर १६६० साली एका खास करारानुसार दिल्याचा उल्लेख "पंत अमात्य बावडा दप्तर" मध्ये आहे.[३२] त्यानंतर इतिहासकार ग.ह. खरे यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे सन १६६२ मध्ये निळो सोनदेवला शिवाजी महाराजांनी "अमात्य" किंवा "मुजुमदार" म्हणून नेमले.[३३] पण १६६१ मध्ये मोरोपंत पिंगळे यास मुजुमदारी दिली होती.[३४] ती केव्हा बंद पडली या संबंधी ग.ह. खरे बोलत नाहीत. निळो पंताच्या या प्रगती बरोबरच, त्याचा बंधू आबाजी पंत याचीही चांगली प्रगती झालेली होती. त्याला कल्याणचे सुभेदार नेमण्यात आले होते.[३५]

अफझलखानाच्या वधानंतर कल्याण व भिवंडी, यांची जबाबदारी आबाजी सोनदेव यांचेकडे सोपविण्यात आली होती.[३६]

---

३२. सबनीस,के.गो.,संपा.पंत अमात्य बावडा दप्तर भाग १ला,गगनबावडा, कोल्हापूर,१९३७,पृ.३-४.

३३. खरे-भिडेआ.,पृ.१४

३४. जेधे शकावली (शके १५९८)पौस शुध्द १२,दक्षणीस राज मोरोपंतास मुजमु दिली. पहा बेंद्रे,वा.सी.,श्री छत्रपति संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र,बुकस्टॉल,मुंबई,द्वितीयावृत्ती,१९७१,पृ.७४.

३५. सगोसमरि.,भाग,२,पृ.२०२-२०३.

३६. Duff, Grant., History of the Marattas, vol. I, Associated Publishing House, New Delhi, 1971.

निळोपंत व आबाजीपंत हे दोघे बंधू शिवाजी महाराजांचे अत्यंत विश्वासू होते व तसेच कर्तृत्ववानही होती. विशेषत: निळोपंत हे मोठे प्रभावी गृहस्थ होते. त्यांनी शिवाजी महाराजांच्या घरांतील सर्वांचा विश्वास संपादन केलेला होता. त्यामुळे त्याचे आणि शिवाजी महाराजांचे व्यक्तीगत संबंध मालक आणि नोकर अशा स्वरूपाचे न राहता मित्र किंवा घरोब्यातील जवळचे लोक, असे होते. या अशा परिस्थितीमुळे शिवाजीच्या घरांतील बाबींमध्ये सुध्दा निळोपंताचे मार्गदर्शन घेतले जाई. शहाजी राजे मरण पावले, तेव्हा म्हणजे सन १६६३ मध्ये जिजाबाईंनी सती जाण्याचा आग्रह धरला होता. पण निळोपंताने अतिशय कौशल्याने जिजाबाईंचे मन वळविले आणि तिला सती जाण्यापासून परावृत्त केले.[३७]

निळोपंत कर्तृत्वान होता व शिवाजीच्या घरातील एक विश्वासू अंमलदार होता; हे वरील बाबीवरून स्पष्ट होत आहे. १६४७ ते १६७२ पर्यंत त्याचे शिवाजी महाराजांकडील स्थान कायम स्वरूपाचे होते. १६५६ मध्ये तो "मुरनिस" झाला असावा, असे निदान सभासद बखरीवरून करता येते.[३८] त्यानंतर तो सतत वाढतच गेलेला आहे. १६६६ मध्ये मात्र, म्हणजे शिवाजी आग्-याला गेले, त्यावेळी निळोपंत मुजुमदार होता, असा उल्लेख आहे.[३९] असा हा कर्तृत्ववान निळोपंत मराठा राज्याच्या उभारणीतील महत्त्वाचा कर्तापुरुष होता. इ.स. १६६४ मध्ये सुरत शहर लुटीच्यावेळी सुध्दा तो शिवाजी बरोबर होता.[४०] त्यानंतर मिर्झा राजा जयसिंगच्या वेळेला शिवाजी महाराजांच्यावर कठीण प्रसंग आला होता आणि महाराष्ट्र सोडून शिवाजी महाराज १६६६ मध्ये बादशहाच्या भेटीसाठी आग्-याला गेले. जाताना मोरोपंत पिंगळे, निळोपंत

---

३७. सगोसमरि,भाग,२,पृ.३७२.
३८. वाकसकर,वि.स.,उपरोक्त.,पृ.९.
३९. कुलकर्णी,भीमराव.,उपरोक्त.,पृ.११३.
४०. गोरे,रा.म.,उपरोक्त.,पृ.१९.

डबीर आणि आण्णाजी दत्तो, या तिघांवर त्यांनी आपल्या राज्याचा कारभार सोपविला होता. आग्-याहून सुटून येताच मोगलांना दिलेले किल्ले व प्रदेश परत घेण्याच्या कामीसुध्दा त्या तिघांनाच नेमलेले होते. त्या तिघांनी ते काम केवळ चार महिन्यात यशस्वी केले होते. त्यानंतर शिवाजीने निळोपंतास बसनूरच्या मोहिमेवर पाठविले होते. निळोपंताची सेवा लक्षात घेऊन शिवाजीने निळोपंताचा पुत्र रामचंद्रपंत, यास सिंधुदुर्गची वतनी सबनिसी दिली व मुतालिकाकडून काम घेण्याचे चालू ठेवले.[४१] सन १६७० मध्ये शिवाजी महाराजांच्या आदेशानुसार निळोपंताने पुरंदर, लोहगड, रोहिडा, हिंदोला, माहुली, कर्नाळा हे गड जिंकून आपले कर्तव्य पार पाडले.[४२] आणि आपले कर्तव्य पार पाडित असतानाच म्हणजे मराठी राज्याच्या संरक्षण व विस्ताराची जबाबदारी पार पाडित असताना, निळोपंत इ.स.१६७२ मध्ये मरण पावले.[४३]

## रामचंद्रपंत:

शिवाजी महाराजांना राज्य उभारण्याच्या कामी सर्वस्व अर्पण करणारे निळोपंत डबीर यांचे नारोपंत व रामचंद्रपंत असे दोन चिरंजीव होते. या नारोपंत आणि रामचंद्रपंत यांच्या जन्म तारखेबद्दल निश्चित स्वरुपाचा पुरावा उपलब्ध नाही. तथापि इतिहासकारांनी तथा अभ्यासकांनी या दोघांची जन्म तिथी निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. नारोपंताच्या बाबतीत कोणीही ठामपणाने सांगू शकत नाही. पण रामचंद्रपंताच्या बाबतीत मात्र सन १६५० हे वर्ष त्याचे जन्म वर्ष म्हणून सांगितले आहे.[४४] या मताला बहुतेकांनी मान्यता दिली आहे. रियासतकार सरदेसाई यांनी

---

४१. उपरोक्त.,पृ.२०-२१.
४२. खरे-भिडेआ.,पृ.१४.
४३. उपरोक्त.,आणि गोरे,रा.म,,उपरोक्त.,पृ.२१.
४४. गोरे,रा.म.,उपरोक्त.,पृ.२६.

रामचंद्रपंताचा जन्म "सन १६५० चे सुमारास झालेला होता", असे स्पष्टपणे सांगितले आहे.[४५] "आज्ञापत्र" संपादन करणारे रा.चि. ढेरे व प्र.वं. जोशी यांनी सुध्दा सरदेसाईच्या मताप्रमाणेच आपले मत व्यक्त केले आहे.[४६]

रामचंद्रपंताचे बालपण वडिलांच्यामुळे शिवाजी महाराजांच्या सानिध्यात गेले होते. पुढे त्यांना शिवाजीने १६६७ मध्ये सिंधुदुर्गची मुजुमदारी दिलेली होती.[४७] मात्र "पंत अमात्य बावडा दप्तर" मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे रामचंद्र-पंताला सिंधुदुर्गची सबनीसी १६६८ पासून दिली होती.[४८] रामचंद्रपंत कर्तृत्ववान होते . त्यांनी वडिलांच्या हयातीतच नावलौकीक मिळविण्यास प्रारंभ केला होता. पण रामचंद्र हे निळोपंताचे जेष्ठ चिरंजीव नसल्याने निळोपंताच्या मृत्यूनंतर निळो-पंताकडील मुजुमदारी थोरला मुलगा नारोपंत व धाकटा रामचंद्रपंत या दोघा बंधूच्याकडे गेली. पण नारोपंत भोळसर असल्याने व रामचंद्रपंत कर्तृत्ववान असल्याने, तसेच शिवाजी महाराजांचा ओढा रामचंद्रपंताकडे असल्यामुळे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी रामचंद्रपंताना अमात्यपद मिळाले. इ.स.१६७२ पर्यंत १६७७ पर्यंत रामचंद्रपंत महाराजांचे अमात्य होते.[४९] १६७७ नंतर रामचंद्रपंत अमात्यपदावर होते की नाही, यासंबंधी इतिहासकारांनी फारशी चर्चा केली नाही. तरीपण "पंतअमात्य संस्थान बावडा यांचे वंशावत्त" या ग्रंथाचे कर्ते रा.म.गोरे यांच्यामतानुसार १६७७ नंतरही रामचंद्रपंत अमात्य पदावरच होते. इ.स. १६८० मध्ये आपल्या अंत्य समयी शिवाजीने ज्या विश्वासू मुत्सद्दी सरदारांना बोलावून आपल्या पश्चात राज्यव्यवस्था कशी चालावी हे सांगीतले, होते, त्यामध्ये रामचंद्रपंत हजर होते, असे म्हटले आहे, आणि शिवाजीच्या मृत्यूनंतर संभाजीने ज्या मुत्सद्दी व सरदारांना अटक केली होती, त्यामध्ये

---

४५. सगोसमरि, भाग, २, पृ.३७२.
४६. जोशीआ., पृ.६.
४७. सगोसमरि, भाग, २, पृ.३७२.
४८. सबनीस, के.गो, उपरोक्त., पृ.९.
४९. ढेरे-जोशीआ., पृ.७.

रामचंद्रपंताचा समावेश होता.[५०]

रामचंद्रपंताचे अमात्यपद संभाजीने दादाजी रघुनाथ प्रभुदेशपांडे महाडकर यांना देण्याचे निश्चित केले होते, पण तसे घडले नाही. संभाजीच्या कारकीर्दीत पुढे रामचंद्रपंत अमात्य पदावर राहिले आहेत. संभाजीला मोगलांनी पकडून नेल्यानंतर रामचंद्रपंताने पुढाकार घेऊन, संभाजीची पत्नी येसूबाई हिच्या अनुमतीने संभाजीचा मुलगा शिवाजी उर्फ शाहू लहान आहे पर्यंत, शिवाजीचा धाकटा युवराज, राजाराम याने राज्य करावे, असे ठरविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. संभाजीची पत्नी येसूबाई आणि मुलगा शाहू यांना मोगलांनी पकडून नेल्यानंतर, राज्य रक्षणाचे महत्त्वाचे काम करण्यात इतर मुत्सद्दी व सरदारांच्या बरोबर रामचंद्रपंत आघाडीवर होते.[५१] राजारामास राज्यसूत्रे बहाल केल्यानंतर मोगलांच्या धोक्यापासून वाचविण्यासाठी जिंजीस पाठविले, आणि पाठीमागे सर्व जबाबदारी रामचंद्रपंतानी आपल्याकडे घेतली.[५२] त्यांचा हा अधिकार "हुकूमतपन्हा"[५३] या नावाने प्रसिध्द आहे. राजारामाच्या कारकीर्दीत "हुकूमतपन्हा" हा अधिकार मिळाला आहे. रामचंद्रपंतावर मराठा राज्याच्या संरक्षणाची फार मोठी जबाबदारी होती. "रामचंद्र पंताकडून जे हुकूम येतील ते छत्रपतींने मोडू नयेत"[५४] इतकी त्या "हुकूमतपन्हा" किताबाची योग्यता होती. रामचंद्रपंताना मिळालेला हा अधिकार, त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक वापरला आणि महत्त्वाच्या बाबतीत छत्रपतींचा सल्ला घेऊनच कार्यवाही केली.

राजाराम महाराजांच्या अंत्य समयी रामचंद्रपंत जवळ होते. मराठा राज्यात ते वयाने जसे जेष्ठ होते, तसे कर्तृत्ववानही सर्वाधिक मान्यता पावले होते.

---

५०. गोरे, रा.म., उपरोक्त., पृ.३०-३१.
५१. उपरोक्त., पृ.३७-३८.
५२. उपरोक्त., पृ.३९-४०.
५३. गर्गे, स.मा., करवीर रियासत, गो.य.राणे प्रकाशन, पुणे, १९६८, पृ.३४.
५४. भागवत, अ.ना., साताऱ्याच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास, श्रीमंत परशुराम त्र्यंबक प्रतिनिधी यांची कारकीर्द, औंध, शके १८४६ पृ.१०५.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

त्यामुळे त्यांनी राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर, लगेच सर्व सेनापतींना पत्रे पाठवून राज्याच्या रक्षणाची जबाबदारी, सर्वांनी मिळून पार पाडावी, असे सांगितले. होते. रामचंद्रपंतावर सर्व मराठा सरदारांचा विश्वास होता. म्हणूनच त्या सर्वांनी राजाराम महाराजांच्या ठिकाणी रामचंद्रपंताचा अधिकार मानून मराठा राज्य रक्षणाची ग्वाही दिली. चिटणीस बखरीमध्ये या सरदारांच्या तोंडी जे वाक्य घातलेले ते असे- "महाराजांचे ठिकाणी आपण आहात. खासा स्वारी असताना कामकाज उदईक करु म्हणत होतो. सांप्रत उद्याचे आज करुन आपणांस विनंती लिहीत जाऊ नये"[५५] या प्रमाणे रामचंद्रपंताला राजारामाच्या मृत्यूनंतर अधिकार प्राप्त झाला होता. म्हणूनच त्याच्या सल्ल्याने संपूर्ण मराठेशाहीचा कारभार एकत्रितपणे चालू होता. पण रामचंद्र-पंत आणि राजारामची जेष्ठ पत्नी ताराबाई यांचे मात्र पुढे चांगले सूत राहिले नाही. कारण राजारामाच्या मृत्यूनंतर ताराबाईला तिचा मुलगा छत्रपती व्हावा, असे वाटत होते. त्यासाठी तिला तिचा पुत्र शिवाजी याची मुंज लवकर करण्याची घाई होती. पण शिवाजीपेक्षा वयाने जास्त असलेला संभाजीचापुत्र शिवाजी म्हणजे शाहू महाराज, जो औरंगजेबाच्या कैदेत होता त्याचीही मुंज झालेली नव्हती. रीतीरिवाजानुसार भाऊ भाऊ असणाऱ्या मुलांमध्ये वयाच्या जेष्ठतेनुसार थोरल्या भावाची मुंज प्रथम व्हावी लागते. काही केळा थोरला भाऊ आणि लहान भाऊ या दोघांच्या मुंजीही एकाचवेळी केल्या जातात. पण थोरल्या भावाची मुंज झाली नसताना धाकट्या भावाची मुंज करता येत नाही. रामचंद्रपंत, या परंपरेने वागणारे होते. तर ही परंपरा मोडून ताराबाईला तिचा मुलगा शिवाजी याची मुंज करावयाची होती. तत्कालीन परिस्थितीनुसार संभाजीचा पुत्र शाहू हाच राज्याचा वारस होता.

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

५५. हेरवाडकर, र.वि., संपा. मल्हार रामराव चिटणीस विरचित श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७२, पृ.६८.

रामचंद्रपंत तशा विचारांचे होते. पण ताराबाईला ते मान्य नव्हते. तिला आपला मुलगा शिवाजी याची मुंज करुन गादीवर बसवावयाचे होते. म्हणून तिने रामचंद्रपंताच्याकडून बळजबरीने परवानगी घेऊन शिवाजीची मुंज केली. आणि आपला मुलगाशिवाजी यास गादीवर बसविले.[५६]

शिवाजी या आपल्या पुत्राला गादीवर बसवून ताराबाईने राज्यकारभार आणि सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. रामचंद्रपंताच्याकडे अमात्यपद चालू ठेवले. पण त्या पदाचा कारभार चालविण्यात त्यांनी पूर्वीसारखा रस घेतला नाही.[५७] तरीही मोगल बादशाहा औरंगजेब याचे आक्रमण थोपवून धरण्यासाठी रामचंद्रपंताने कसल्याही प्रकारची ढिलाई केली नाही.[५८]

शाहू,मोगलांच्या कैदेतून सुटून आल्यावर रामचंद्रपंत अडचणीत आले. परंपरेने त्यांची निष्ठा शाहूबरोबर होती. "ताराबाईचा पक्ष धरुन राहिल्यास पदरीं हरामखोरीं येते. शाहूचा पक्ष स्वीकारल्यास शपथेस बादा येतो. दोहोपैकी कोणताही पक्षअंगिकारला तरीही दोष येण्याचें चुकत नाहीं."[५९] अशा विचित्र पिरिस्थितीत पंत सापडले होते. शेवटी ताराबाईचे पक्षातच पंत राहीले. रामचंद्रपंताच्या मार्गदर्शनानुसार ताराबाईने संपूर्ण राज्य मिळविण्याचा नाद सोडून कोल्हापूरचे राज्य स्थापन केले.[६०] ताराबाईच्या पक्षात काम करीत असताना रामचंद्रपंताना फारसे समाधान नव्हते. शिवाय ताराबाई आणि त्यांचे तसे जमतही नव्हते. इ.स. १७१४ मध्ये ताराबाईंची राजवट संपवून म्हणजे ताराबाईचा पुत्र शिवाजी याला गादीवरुन हुसकून लावण्यात आले आणि त्याजागी राजारामाचा दुसरा पुत्र म्हणजे राजारामाची तीन नंबरची राणी

५६. गर्गे,स.मा.,उपरोक्त.,पृ.४६-४७.
५७. उपरोक्त.,पृ.४७.
५८. गोरे,रा.म.,उपरोक्त.,पृ.५८-६१.
५९. उपरोक्त.,पृ.६४.
६०. उपरोक्त.,पृ.७२.

राजसबाई हिचा पुत्र संभाजी छत्रपती झाला. ही जी क्रांती झाली होती त्या क्रांतीच्या पाठीमागे रामचंद्रपंताचा हात होता, असा समज आहे.[६१] त्यानंतर इ.स. १७१४ ते १७१६ पर्यंत रामचंद्रपंत संभाजी महाराजांचे प्रमुख सल्लागार होते. इ.स. १६७२ पासून ते इ.स. १७१६ पर्यंत म्हणजे जवळ जवळ ४४ ते ४५ वर्षे पंतानी मोठया हिमतीने मराठयांच्या राजकारणात सक्रिय भाग घेऊन महत्त्वाची कामगिरी बजावली होती. त्या काळामध्ये त्यांचा सारखा अनुभावी, कर्तृत्ववान मार्गदर्शक,असा वयोवृध्द माहीतगार राहिलेले नव्हता. असे हे रामचंद्रपंत ८ फेब्रुवारी १७१६ मध्ये पन्हाळा येथे मृत्यू पावले.[६२] आणि त्यांची समाधी आज पन्हाळयावर पहायला मिळते.

.....

=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=-=

६१. गर्गे.,स.मा.,उपरोक्त.,पृ.११०.

६२. पंडित,रा.प.,यांचा अप्रकाशित लेख. हा लेख व आणखी दोन तीन लेख इतिहास संशोधक गुळवणी पन्हाळा, जि. कोल्हापूर यांच्या खाजगी संग्रहातून मला झेरॉक्स करून मिळाले आहेत ते माझ्या संग्रही आहेत.पृ.३.